# नियमीत दिवाणी दावा क्र. २३/२०१९ मधील

## नि.०५ वरील आदेश

## सीएनआर–एमएचएसएन १२–०००२१३–२०१९

(सुजाता आबदर वगैरे वि. लक्ष्मण आबदर वगैरे)

प्रस्तुतचा अर्ज हा वादींनी प्रतिवादी नं.१,३ ४,५ व ७ विरुद्ध तुर्तातुर्त ताकीद देणेकामी दाखल केला आहे.

२. प्रस्तुतचा दावा वादींनी प्रतिवादींविरुद्ध वाटप, जाहीर स्वरुपाची दाद, निरंतर ताकीदीकरता दाखल केलेला आहे.

३. प्रस्तुतच्या दाव्यात वादींनी असे कथन केले आहे की, पलूस गावचे हद्दीतील मौजे गट नं.२४० क्षेत्र ०हे ९२ आर यामधील संपूर्ण हिस्सा व गट नं.२४१ क्षेत्र ०हे ०९ आर यामधील संपूर्ण हिस्सा व घर मिळकत ४४३६/४३ (गट नं.२४०) मधील प्रतिवादी नं.७ चे नावे असलेले कौलारु घर याप्रमाणे नमूद केलेल्या शेतमिळकती व घरमिळकत ही दावा मिळकत १अ आहे. तसेच, दाव्यामध्ये परिच्छेद २ मध्ये नमूद केलेली मौजे–सांडगेवाडी, ता. पलूस येथील गट नं. ११ क्षेत्र ० हे ३६ आर व सदर गटामध्ये प्रतिवादी नं.१ च्या नावे असणारी घर मिळकत मालमत्ता क्र. ७० ही दावा मिळकत १ब आहे. सदर मिळकतीचे वाटप, निरंतर ताकीद व जाहीर स्वरुपाची दाद हा दाव्याचा प्रमुख विषय आहे.

४. वादींनी दाव्यामध्ये पुढे असे कथन केले आहे की, दावा मिळकत १अ व १ब या मिळकती वादीच्या हिंदू एकत्र कुटुंबाच्या होत्या व आहेत. सदर

मिळकती या वादी कुटुंबाचे पूर्वहक्कदार गणपती गुंडा आबदर यांच्या वडिलार्जित मिळकती होत्या व आहेत. वादी नं.१ ही प्रतिवादी नं. १ व २ यांची मुलगी आहे व प्रतिवादी नं.३ ची बहीण आहे व प्रतिवादी नं. ४ व ५ हे वादी नं.१ चे चुलते आहेत. तसेच, प्रतिवादी नं.६ ही वादी यांची चुलती आहे. तसेच, प्रतिवादी नं. ७ ही वादीची आज्जी आहे. वादी नं.१ ते ७ हे एकत्र कुटुंबातील सदस्य होते व आहेत. तसेच, वादी नं. २ ते ४ व वादी नं.७ यांचे प्रतिवादी नं.४ हे वडिल आहेत. प्रतिवादी नं.६ ही वादी नं. ४ ते ७ हे वादींचे नातेवाईक आहेत. प्रतिवादी नं. ८ व ९ हे ति–हाईत इसम आहेत. सदर दावा मिळकतीमध्ये दावा मिळकतीपैकी शेतमिळकतीपैकी वादी व प्रतिवादी विविध पिके घेतात व त्यांनी वहिवाट एकत्रात होती व आहे.

५. दावा मिळकत १अ व १ब चे अद्याप सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. अशी परिस्थीती असताना देखील प्रतिवादी नं १,३,४,५ व ७ हे दावा मिळकती बेकायदेशीररित्या एकत्र कुटुंबाचे कर्ते नसताना देखील एकत्र कुटुंबाचे हित नसताना देखील केवळ चैनीकरिता प्रतिवादी नं. ८ व ९ या बँकेचा बोजा करुन ठेवल्याचे वादीला दिसून आले. संबंधित प्रतिवादींना एकत्र कुटुंबाच्या मिळकतीवर म्हणजे दावा मिळकत १अ व १ब वरती बोजा निर्माण करण्याचा हक्क नव्हता व नाही. सदर प्रतिवादींनी घेतलेले कर्ज हे बेकायदेशीर असून वादींनी त्याचा लाभ घेतलेला नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी नं. ८ व ९ यांनी वादींना नोटीस पाठवली व ती नोटीस वादींना दि. २०/०२/२०१९ रोजी प्राप्त झाली.

सदर नोटीसीच्या आधारे वादींनी चौकशी केली असता प्रतिवादी नं. ८ व ९ यांनी उडवाउडवीची उत्तरे देवून आम्ही दावा मिळकती जप्त करणार आहोत असे म्हणाले व वादींचा दावा मिळकतींशी काही संबंध नाही असे कथन केले. तसेच, वादींनी कर्जाबाबत चौकशी केली असता कर्जाबद्दल आम्ही कोणतीही माहिती देवू शकत नाही असे सांगितले व सदरील मिळकत आम्ही विक्री देखील करणार असल्याचे कळवले. म्हणून वादींनी प्रतिवादी नं. ८ व ९ यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम १०८ चे अन्वये दावा पूर्व नोटीस पाठवली.

६. वादींनी दाव्यात पुढे असे कथन केले आहे की, दावा मिळकतीचे वादींनी उतारे काढले असता बँकेचे नावे जप्ती आदेशाचा बोजा रेकॉर्डसदरी झालेचे दिसून आले. असे जरी असले तरी, दावा मिळकती या वादी व प्रतिवादींच्या एकट्याच्या मालकीच्या नाहीत व त्यामध्ये चतुःसीमापूर्वक वाटप झालेले नाही. वादी नं.७ चे वडिल, चुलते, चुलतभाऊ म्हणजे प्रतिवादी नं.१,३,४,५ हे दारुच्या व्यसनामुळे व चैनीखोर स्वभावामुळे वादीचा सांभाळ करत नाहीत व वादी नं.७ ही अज्ञान असल्यामुळे त्याचा सांभाळ करतात. वादींना दावा मिळकतीत १/१५ एवढा हिस्सा आहे. परंतु, सदर वादींच्या १/१५ हिस्याची मिळकत व प्रतिवादी नं. १ ते ७ यांच्या हिस्याची मिळकत ही कर्ज घेवून तारण ठेवली आहे व प्रतिवादी नं. १,३,४,५ व ७ यांच्याशी संगनमत करुन प्रतिवादी नं. ८ व ९ त्याची विक्री करणार असल्याचे वादीला नुकतेच समजले. कायद्याने जप्ती येणार असल्याने व ती जप्ती करुन विक्री होणार असल्याने सर्व वादींचे पैशाने न भरुन येणारे

अपरिमित नुकसान होणार आहे. कारण, प्रतिवादी नं १,३,५ व ७ यांनी घेतलेले कर्ज वादींच्या हिस्यावर बंधनकारक नव्हते व नाही. सदर कर्जाचा वादींशी काहीही संबंध नव्हता व नाही.

७. वादींनी दाव्यामध्ये पुढे असे कथन केले आहे की, वादींनी कर्जाबाबतची व जामीनाबाबतची कागदपत्रांची मागणी केली असता प्रतिवादी नं. ८ व ९ यांनी उडवाउडवीची उत्तरे करुन दावा मिळकतींवर जप्तीचा आदेश घेतला आहे व सर्व मिळकती विक्री करण्याच्या बेतामध्ये ते आहेत व दावा मिळकत १अ व १ब हिचे वाटप झाल्याशिवाय तशी जप्ती व विक्री प्रतिवादी नं. ८ व ९ यांना करता येणार नाही. दि.०९/०३/२०१९ रोजी वादीची वाटणीची मिळकत आहे असे सांगितल्यावर प्रतिवादी नं. ८ व ९ यांनी स्थावर मिळकतींच्या ताब्याची नोटीसीची झेरॉक्स प्रत वादी नं.१ ते ६ यांना दिली व दावा मिळकत १ अ व १ब ही जप्त करणार व विक्री करणार असल्याचे ते सांगू लागले. वादींनी कर्ज घेतले नसल्यामुळे ते वादींवर बंधनकारक असल्याचा प्रश्न निर्माण होत नाही. प्रतिवादी नं. ८ व ९ हे वादींचे मालकी हक्क व वहिवाटीस अडथळा करत असून वादींना हूसकावून लावण्याची भाषा ते करत आहेत. या सर्व कारणास्तव वादींनी अशी विनंती केली की वादीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस प्रतिवादी नं. १,३,४,५,व ७ यांनी हरकत अडथळा करु नये व कब्जेवहिवाटीच्या मिळकतींतून दावा मिळकतींचे वाटप होईपर्यंत वादींना हूसकावून लावू नये अशी तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादी नं. १,३,४,५ व ७ यांचे विरुद्ध द्यावी.

८.     प्रस्तुतकामी प्रतिवादी नं. १ ते ७ विरुद्ध दावा एकतर्फा चालवण्यात आला आहे.

९.     प्रस्तुतकामी प्रतिवादी नं. ८ व ९ यांनी जरी त्यांच्याविरुद्ध स्पष्टपणे तुर्तातुर्त ताकीद अर्जाची दाद मागितली नसली तरी त्यांनी कर्ज अदा केले असल्याने ते दाव्यात जसे महत्वाचे पक्षकार म्हणून सामील केले आहेत तसे अर्जामध्ये पण त्यांना सहभाग घेणेस व युक्तीवाद करणेस परवानगी मिळावी असा अर्ज त्यांनी नि.३३ द्वारे केला व तो अर्ज मंजुर झाला.

१०.     प्रतिवादी नं. ८ व ९ यांनी दाव्यास व प्रस्तुतच्या अर्जास नि.२९ द्वारे दाव्यास कैफियत व प्रस्तुतच्या अर्जास म्हणणे सादर केले. वादी व प्रतिवादी नं. १ ते ७ यांच्यातले नातेसंबंध तेवढे मान्य केले, परंतु, अर्जातील अन्य कथने स्पष्टपणे नाकारली. प्रतिवादी नं. ८ व ९ यांनी असे कथन केले की, वादी यांनी प्रतिवादी नं. १ ते ७ यांच्याशी संगनमत करुन प्रस्तुतचा दावा कर्ज वसूल होवू नये या हेतूने केला आहे. तसेच, वादींना संबंधित कर्जाची व वसुलीची पूर्वीपासून पूर्णपणे कल्पना होती व आहे. दाव्यास कोणतेही कारण घडलेले नाही. तसेच घर मिळकत गट नं. ११ मधील मालमत्ता क्र. ७० व गट नं २४० मधील घर मिळकत मालमत्ता क्र. ४४३६/४३१ या मिळकतींची वर्णने अपुरी व चुकीची आहेत. वादींनी सर्व दावा मिळकती वाटपासाठी सामील केल्या नाहीत. त्यामुळे, common hotchpot मध्ये मिळकती समाविष्ट न केल्याची बाधा दाव्याला येते.

तसेच, महत्वाचे पक्षकार देखील सामील न केल्याने दावा फेटाळणेस पात्र आहे व अंशतः वाटप (partial partition) हे देखील फेटाळणेस पात्र आहे.

११. प्रतिवादी नं.८ व ९ यांनी पुढे असे कथन केले की, प्रतिवादी नं १, ३,४,५ व ७ यांनी दावा मिळकतीवर बेकायदेशीररित्या एकत्र कुटुंबाचे कर्ते नसताना व एकत्र कुटुंबाचे कोणतेही हित नसताना कर्ज उचलले व ती केवळ चैनीकरता उचलले ही बाब खोटी आहे. संबंधित प्रतिवादी हे वादी व अन्य प्रतिवादींचे कुटुंबाचे कर्ते पुरुष होते व आहेत. तसेच एकत्र कुटुंबाचे आदिती कन्स्ट्रक्शन, आदिती हॉटेल, लॉजिंग व परमिट रुम, बिअरबार हे व्यवसाय देखील उभे केलेले आहेत व सदर व्यवसायांमध्ये वाढ होण्यासाठी म्हणजेच एकत्र कुटुंबाच्या हितासाठी प्रतिवादी नं. ८ व ९ या संस्थेकडून कर्ज घेण्यात आलेले आहे. कर्ज हे कायदेशीररित्या अदा केले आहे. सदर कर्जाची कल्पना वादींना दि २०/०२/२०१९ च्या नोटीसीने प्राप्त झाली ही बाब पूर्ण खोटी आहे. कारण वादींना पूर्वीपासून कर्ज दिल्याची कल्पना होती व आहे.

१२. प्रतिवादी नं. ८ व ९ यांनी पुढे असे कथन केले की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,१९६० चे कलम १६४ नुसार दोन महिन्यांचा पूर्व कालावधी संपल्याशिवाय दावा दाखल करण्याचा अधिकार वादींना नव्हता व नाही. त्यामुळे दावा अकालीक (pre-mature) आहे. वास्तविक प्रतिवादी नं. १,३,४,५ व ७ यांनी एकत्र कुटुंबाचे हिताकरता व गजरेपोटी कर्ज घेतले

असल्याने त्यांना संबंधित मिळकती तारण ठेवण्याचा हक्क व अधिकार होता व आहे. तसेच, सदरील कर्ज थकीत राहिल्याने संस्थेला कर्ज वसूल करण्याचा अधिकार होता व आहे. वादीने प्रतिवादी नं. १ ते ७ यांच्याशी संगनमत केले आहे. वादी व प्रतिवादी नं. १ ते ७ यांना शासकीय धोरणामुळे व कायदेशीर कामकाजामुळे तोटा झाला आहे व सदरील कर्ज थकीत राहिले आहे. दिवाणी न्यायालयास अशा प्रकारची दाद देण्याचा अधिकार नाही. वादीने दावा मिळकतीचे बाजारमूल्य हे चुकीचे दाखवले आहे व या ही कारणास्तव वादीचा दावा फेटाळण्यास पात्र ठरतो. केवळ प्रतिवादी नं. ८ व ९ यांनी दिलेले कर्ज वसूल होवू नये याकरिता प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. कर्ज थकीत असल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ नुसार वसुली दाखला घेतला असून त्यानुसार वसुली प्रक्रिया सुरु केली आहे व त्याविरुद्ध दिवाणी न्यायालयाकडे दाद मागता येणार नाही.

१३. प्रतिवादी नं. ८ व ९ यांनी पुढे असे कथन केले की, वादी व प्रतिवादी नं. १ ते ७ यांचे एकत्र कुटुंब असून प्रतिवादी नं. १,३,४,५ हे एकत्र कुटुंबाचे कर्ते आहेत. तसेच प्रतिवादी नं. १,३,४,५ व ७ हे प्रतिवादी नं. ८ व ९ हे संस्थेचे सभासद आहेत व त्यांना आदिती कन्स्ट्रक्शन, आदिती हॉटेल, लॉजिंग व परमिट रुम, बिअर बार या व्यवसायाच्या वाढीसाठी व शेती व्यवसायाच्या वाढीसाठी कर्जाची गरज भासल्याने त्यांनी संबंधित संस्थेकडे कर्जाची मागणी केली व संस्थने दि. २३/०९/२०१५ रोजी एकत्र कुटुंबाच्या व्यवसाय वाढीसाठी

५०,००,०००/- (पन्नास लाख रुपये )चे कर्ज १५% व्याजाने उचलले व दावा मिळकती संस्थेला तारण दिल्या. त्यानंतर दि.२७/०८/२०१६ रोजी परत ४०,००,०००/- (चाळीस लाख रुपये) चे कर्ज १४.७५ % व्याजाने उचलले. सदरची कर्जे ही वादी व प्रतिवादी नं.१ ते ७ यांच्यावर बंधनकारक होती व आहेत. तसेच दावा मिळकती तारण ठेवल्याने विविध करारपत्र, तारणाचा लेख करुन त्यामध्ये एकत्र कुटुंबाचे संबंधित व्यवसायाकरिता कर्ज घेतले आहे ही बाब त्यामध्ये नमूद आहे. परंतु, व्यवसायांत तोटा झाल्याने व कर्ज थकीत राहिल्याने दि.२३/०९/२०१५ रोजी संबंधित संस्थेने प्रतिवादी नं.१,३,४,५ व ७ यांचेविरुद्ध व त्यांचे जामीनदारांविरुद्ध सहकार कायद्यातील कलम १०१ ची प्रक्रिया चालवली व त्यानुसार तसा दाखला मिळवला. संबंधित जामीनदारांकडून पण वसूली चालू आहे. कर्जाचा बोजा, तारण गहाण खतानंतर दावा मिळकतीचे रेकॉर्डला नोंदवला आहे याची संपूर्ण कल्पना वादींना होती व आहे. त्यामुळे सदरची कर्जे ही वादींवर बंधनकारक नाहीत अशा प्रकारची दाद वादींना मागता येणार नाहीत. त्यामुळे वादींना निरंतरची ताकीद देखील मागता येणार नाही. वास्तविक वसुलीत हरकत, अडथळा असे होईल असे कृत्य वादींना करता येणार नाही. वास्तविक दि.०३/०७/२०१८ रोजीचे अखेर संस्थेस रक्कम रुपये ४२,१२,५९३/- एवढी रक्कम व त्यावरील व्याज येणे बाकी आहे. त्यामुळे संस्थेचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. या सर्व कारणास्तव वादींचा अर्ज फेटाळण्याची विनंती प्रतिवादी नं.८ व ९ यांनी केली.

१४.    अर्जातील कथने व म्हणणे व दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकल्यावर खालील मुद्दे विचारार्थ येत आहेत व त्यावरील मी माझे निष्कर्ष कारणांसह नोंदवत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादींना सकृतदर्शनी केस असल्याचे वादी शाबीत करतात काय ? | **नकारार्थी** |
| २. | न्यायाचा समतोल वादींच्या बाजुने आहे काय ? | **नकारार्थी** |
| ३. | वादींचा अर्ज नामंजूर झाल्यास वादींचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल असे वादींनी शाबीत केले आहे काय ? | **नकारार्थी** |
| ४. | काय आदेश ? | ***अर्ज नामंजुर करण्यात येतो*** |

## कारणमिमांसा

१५.    वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या संबंधित कागदपत्रांचा उल्लेख योग्य त्या ठिकाणी केलेला आहे.

१६.    सदरकामी वादीचे विद्वान विधीज्ञ श्री. ए.आर. देसाई यांनी असा युक्तीवाद केला की, मुळामध्ये कर्ज हे एकत्र कुटुंबाच्या हिताकरिता प्रतिवादी नं. १,३,४,५ व ७ यांनी उचलेले नव्हते व नाही. तसेच, दावा मिळकत १अ व १ब हिचे सरस निरस मनाने वाटप झालेले नाही. त्यामुळे त्या एकत्र कुटुंबाच्या मिळकती असल्याने त्यामध्ये सर्व वादींचा हिस्सा येत आहे. सदर मिळकती

परस्पर तारण ठेवणे, परस्पर त्यावर कर्ज उचलणे या गोष्टींचा अधिकार पूर्णपणे प्रतिवादी नं. १,३,४,५ व ७ यांना नाही. विशेषतः वादींचा १/१५ हिस्सा हा संबंधित प्रतिवादींना परस्पर बँकेला तारण ठेवण्याचा अधिकार नसल्याने प्रथमदर्शनी वादींच्या बाजूने केस आहे. तसेच, जरी संबंधित दावा मिळकती या तारण दिल्या असल्या तरी त्याबाबतची संमती वादींची घेतलेली नव्हती व नाही. तसेच, त्यांनी असा देखील युक्तीवाद केला की DRT यांना वाटप करुन देण्याचा हक्क, अधिकार नाही व तो हक्क केवळ दिवाणी न्यायालयास कायद्याने दिलेला आहे. त्यामुळे प्रस्तुतचा दावा चालणे पात्र आहे.

१७. वादीतर्फे विद्वान विधीज्ञ यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी नं. ८ व ९ यांच्याविरुद्ध तुर्तातुर्त ताकीद अर्जाची दाद मागितलेली नाही. त्यामुळे, प्रतिवादी नं.८ व ९ यांना कोणतीही हरकत अथवा आक्षेप अथवा प्रस्तुतच्या अर्जास विरोध करण्याचा अधिकार नव्हता व नाही. जरी न्यायालय नैसर्गिक न्याय म्हणून त्यांची बाजू ऐकत असले तरी त्यांच्याविरुद्ध दाद मागितली नसल्याने प्रतिवादी नं. ८ व ९ यांचे म्हणणे विचारात घेण्याची आवश्यकता नाही. वास्तविक वादी हे स्वच्छ हाताने न्यायालयापुढे आलेले आहेत. वादींच्या बाजुने प्रथमदर्शनी केस आहे, कारण प्रतिवादी नं.१,३,४,५ व ७ यांच्या कर्जाला वादींची संमती नव्हती व नाही व त्यांना सदर कर्जाबाबत कोणतीही कल्पना नव्हती व जेव्हा दावा मिळकतीचे वाटप करुन मागितले त्यावेळेस म्हणजे दि. ०९/०३/२०१९ रोजी प्रतिवादी नं. ८ व ९ यांच्या कर्जाबाबतची माहिती

प्रथमच वादींना कळाली. त्यामुळे दाव्यास कारण घडले व अशा परिस्थितीत जर जप्ती व विक्री प्रक्रिया चालू झाली तर वादींना त्यांच्या हिस्यास मुकावे लागणार आहे व त्यामुळे त्यांच्या बाजुने न्यायाचा समतोल आहे व अर्ज फेटाळण्यास त्यांचे कशानेही न भरुन येणार नुकसान होईल या सर्व कारणास्तव अर्ज मंजुर करणेत यावा.

१८. प्रतिवादी नं. ८ व ९ यांचे विद्वान विधीज्ञ श्री. व्ही.पी. माने यांनी असा युक्तीवाद केला की, जरी संबंधित प्रतिवादींविरुद्ध दाद मागितली नसली तरी जर अर्ज मंजुर झाला तर प्रतिवादी नं. ८ व ९ यांचे कर्ज वसुलीचे हक्कावर अडथळा निर्माण होणार आहे. तसेच, प्रतिवादी नं. १,३,४,५ व ७ यांनी उचलेले कर्ज हे हॉटेल, लॉजिंग, परमिट रुम, शेती व्यवसाय या एकत्र कुटुंबाच्या व्यवसाय वाढीसाठी उचलेले असल्याने ते कर्ज वादींवर देखील बंधनकारक आहे. तसेच, जे तारण गहाणखत संस्थेच्या लाभात केले आहे त्या आधारे संस्थेला वसूली करण्याचा पूर्ण हक्क, अधिकार होता व आहे. तसेच, वादींनी प्रतिवादी नं. १ ते ७ यांच्याशी संगनमत साधून हा दावा दाखल केला आहे. या बाबींचा विचार करता वादी हे न्यायालयापुढे स्वच्छ हाताने आलेले नाहीत, ही बाब स्पष्ट होते.

१९. प्रतिवादी नं. ८ व ९ यांचे विद्वान विधीज्ञ यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, जप्ती प्रक्रिया चालू केली असून त्याबाबत संस्थेला कायदेशीर अधिकार प्राप्त आहेत. तसेच, नि.३६/१७ ला जप्त स्थावर मिळकतीचा ताबा घेणेकामी

मंजुरी मिळणेकामी तहसिलदार यांना अर्ज केला आहे. तसेच, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांची ताबा घेणेची शिफारस होणेबात विनंती अर्ज देखील केला आहे हे नि.३६/१९ चे कागदपत्रांवरुन दिसून येते. तसेच, स्थावर मिळकतीचा ताबा घेणेबाबत देखील दि. १७/०२/२०२० रोजी तहसिलदार यांच्याकडे अर्ज केला आहे हे देखील नि.३६/२० चे कागदपत्रांवरुन दिसून येते. तसेच, तारण गहाण खत हे नोंदणीकृत आहे व ते सक्षम न्यायालयाकडून रद्दबातल ठरवले गेलेले नाही. वास्तविक संस्थेने मोठ्या प्रमाणात रक्कम गुंतवली आहे व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदींचा विचार करता कर्ज देणे कर्ज वसुली करणे हे सर्व अधिकार संस्थेला आहेत व जर अर्ज मंजुर झालेस प्रतिवादी नं. ८ व ९ च्या हक्कांवर गदा निर्माण होणार आहे व त्यामुळे प्रथमदर्शनी केस वादींच्या बाजूने नाही. न्यायाचा समतोल देखील वादींच्या बाजूने नाही व अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादीला कर्जाची रक्कम वसूल करण्यास हरकत, अडथळा निर्माण होणार आहे. या कारणास्तव प्रतिवादींचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल यामुळे वादींचा अर्ज फेटाळण्यात यावा.

२०. प्रथमदर्शनी दिवाणी न्यायालयास वाटपाचा दावा चालवण्यास कायद्याने अधिकार प्राप्त आहेत व वाटपाच्या दाव्याद्वारे एखाद्याचा हिस्सा देणे अथवा न देणे या बाबी ठरवण्याचा अधिकार DRT ला नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी न्यायालयास अधिकार आहे का नाही ही बाब पाहिली तरी पुरेशी आहे. तसेच दि.प्र.सं. कलम ९ चे विचार करता दावा वाटपाचा असल्याने दिवाणी

न्यायालयास दावा चालवण्याचा अधिकार आहे हे प्रथमदर्शनी वाटत आहे. कारण सद्यास्थितीला दावा  हा तुर्तातुर्त ताकीदीच्या अर्जावर आहे.

२१.	तुर्तातुर्त ताकीद अर्ज ठरवतेवेळी पक्षकाराने न्यायालयापुढे स्वच्छ हाताने येणे अत्यंत आवश्यक आहे व अनेकदा विविध न्यायनिर्णयामध्ये आदरणीय उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय यांनी स्पष्ट केले आहे की पक्षकाराचे वर्तन देखील मनाई अर्ज ठरवताना विचारात घेणे नितांत आवश्यक आहे. जरी प्रस्तुतच्या अर्जामध्ये प्रतिवादी नं. ८ व ९ विरोधात कोणतीही दाद मागितली नसली तरी जर अर्ज मंजुर झाला तर मात्र प्रतिवादी नं. ८ व ९ यांच्या कर्ज वसुलीच्या हक्कावर निश्चितपणे अडथळा निर्माण होणार आहे. कारण वादीने प्रस्तुतच्या अर्जात प्रतिवादी नं. ८ व ९ हे प्रतिवादी नं १,३,४,५ व ७ यांच्या मदतीने हरकत अडथळा करत आहे असे कथन केले आहे. परंतु, निरंतरची ताकीद केवळ प्रतिवादी नं.१,३,४,५ व ७ यांच्याविरुद्ध मागितली आहे व अशा परिस्थीतीमध्ये वादी हे न्यायालयापुढे स्वच्छ हाताने आल्याचे वाटत नाही. कारण दाव्यामध्ये देखील (दावा कलम १५क) मध्ये वादींनी मुख्य मागणी अशी केली आहे की, प्रतिवादी नं. १,३,४,५ व ७ यांनी प्रतिवादी नं. ८ व ९ च्या बेकायदेशीर कर्जाबाबत जप्ती, लिलाव अथवा हस्तांतरण करु नये व वादींना दावा मिळकतीतून हुसकावून लावू नये अशी निरंतर ताकीद प्रतिवादी नं १,३,४,५ व ७ यांना देण्यात यावी.

२२. सदरकामी एक बाब आवर्जुन नमूद करावीशी वाटती की, मनाई आदेश हा equity च्या संकल्पनेवर आधारीत आहे व जो व्यक्ती मनाईचा आदेश मागतो त्याने one who seeks equity has to come with clean hands before the court या तत्वाचा अवलंब त्याने करायलाच हवा व या तत्वाला तडा जाईल असे वर्तन वादीने केल्यास तो मनाई आदेश मिळणेस पात्र ठरत नाही. केवळ हिस्सा आहे असे जरी ग्राह्य धरले तरी या एका कारणास्तव वादीचा मनाई अर्ज मंजुर होणेस पात्र ठरतो असे नाही. तसेच प्रथमदर्शनी वादींनी प्रतिवादी नं. १ ते ७ यांच्याशी संगनमत करुन दावा दाखल केला आहे याची शक्यता नाकारता येत नाही. कारण एकत्र कुटुंबामध्ये जर कुणी एवढ्या मोठ्या रकमेचे कर्ज उचलत असेल तर ती बाब कुटुंबातील सदस्यांना पहिल्यापासून माहित असते. संबंधित प्रतिवादींकडून वादींना त्याची कल्पनाच नव्हती ही बाब प्रथमदर्शनी स्वाभाविक वाटत नाही. कारण सन २०१५ पासून कलम १०१ ची प्रक्रिया चालू झाली आहे हे प्रथमदर्शनी दिसते व दावा २०१९ ला दाखल केला आहे. एवढ्या मोठ्या कालखंडात वादींशी संबंधित प्रतिवादींनी घेतलेल्या कर्जाबद्दल कसलीच चर्चा केली नाही ही बाब स्वाभाविक वाटत नाही. कारण एकत्र कुटुंबामध्ये या गोष्टींची चर्चा होत असते. विशेषतः एवढया मोठ्या रकमेचे कर्ज उचलले जाते त्यावेळी तशी चर्चा होणारच. परंतु, वादी म्हणतात त्यांना कर्जाची कसलीही कल्पना नाही हे प्रथमदर्शनी अयोग्य वाटते. त्यामुळे कर्जाची कल्पना असल्याचे प्रथमदर्शनी स्वाभाविक वाटते व सदरील बाब वादींनी न्यायालयापासून लपवली आहे व त्यांना

महत्वाची बाब लपवल्याची बाधा येते. त्यामुळे वादींची वर्तन नैसर्गिकरित्या योग्य आहे असे वाटत नाही. सदरकामी जर वादी स्वच्छ हाताने आले नसतील तर त्यांची मागणी फेटाळणेस पात्र ठरते, याबाबत तीळमात्र शंका नाही. सदरकामी मी खालील न्यायनिर्णयाचा आधार घेत आहे.

***Yeshwant Payee Raikar & Ans. Vs. Laxman V. Singbal & Ors. 2009 CJ (Bom.) 1862,*** wherein Hon'ble Bombay High Court has held that if the party pleads such a story which does not stop at failing to inspire confidence, but walks ahead and create grave suspicioun about his approaching Court by making suppression is not entitled for relief of injunction, because, one who comes before the Court has to come with clean hands.

२३. तसेच, सदरकामी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चे नियम १०७ पोटनियम १९ (ब) चा विचार करता जप्त केलेल्या मिळकतीची विक्रीची नोटीस काढल्याशिवाय व त्यावरील हरकत/आक्षेप निर्माण झाल्यास ते निकाली काढल्याशिवाय सहकारी संस्थेविरोधात दावा दाखल करता येणार नाही. प्रस्तुकामी वादींनी असे दाखवून दिले नाही की विक्रीची नोटीस (advertisement of sale) निघालेली आहे. तसेच वादींनी दाव्यात केलेल्या मुख्य मागणींचा विचार करता दावा संस्थेच्या हक्कावरती गदा येत असल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चा नियम १०७ पोटनियम १९(ब) चा विचार करता दावा अकालीक ( pre-mature ) वाटत आहे. त्यामुळे, वादीच्या बाजूने प्रथमदर्शनी केस नाही, न्यायाचा समतोल देखील वादीच्या बाजुने नाही व अर्ज मंजुर झाल्यास

वादीपेक्षा प्रतिवादींचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल असे वाटत असल्याने मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर मी 'नकारार्थी' देतो व मुद्दा क्र. ४ करिता मी खालील आदेश पारित करतो.

## **आ दे श**

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE
Date: 2022.02.21 11:27:38 +05'30'

**पलुस.** **(नि.दि. रुद्रभटे )**

**दिनांक– १७/०२/२०२२** **सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर पलूस**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Pravin G. Sabale |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Palus |
| Date | : | 17/02/2022 |
| Signed by the Presiding Officer on | : | 17/02/2022 |
| Uploaded on | : | 21/02/2022 |